Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक ७] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १३-१९, २०२०/माघ २४-३०, शके १९४१ [पृष्ठे १०, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक- शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-२ |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २-१० |
| **भाग एक-अ.**–(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-४ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४२.

### विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जानेवारी, २०२०.

क्रमांक डीजीपी-१७१५-प्र.क्र. ३७६-का. १४.—

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या ऑर्डर २७, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४(३) व महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १९८४ च्या नियम १३ मधील तरतुदीनुसार बुलढाणा जिल्हा व सत्र न्यायालयाकरीता खालील अनुसूचित नमूद विधि अधिका-यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर शासन अधिसूचना समक्रमांक दिनांक ११ जानेवारी २०१६ अन्वये २ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्तीस वेळोवेळी देण्यात आलेल्या मुदतवाढीचा कालावधी दिनांक १९ जानेवारी २०२० रोजी समाप्त होत आहे.

सदर नियुक्तीस दिनांक २० जानेवारी २०२० पासून पुढील आदेशापर्यंत अथवा त्यांच्या वयास ६२ वर्षे पूर्ण होतील तो दिनांक यापर्यंतचा कालावधी, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ॲड. वसंत लक्ष्मण भटकर | सहायक सरकारी वकील व अतिरिक्त शासकीय अभियोक्ता |
| २ | ॲड. राजेश्वरी अजय आळशी | सहायक सरकारी वकील व अतिरिक्त शासकीय अभियोक्ता |
| ३ | ॲड. प्रशांत त्र्यंबकराव लाहुडकर | सहायक सरकारी वकील व अतिरिक्त शासकीय अभियोक्ता |

२. ॲड. वसंत लक्ष्मण भटकर, सहायक सरकारी वकील व अतिरिक्त शासकीय अभियोक्ता यांना शासन आदेश समक्रमांक दिनांक १७ ऑक्टोबर २०१८ अन्वये जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सदर शासन आदेश पुढील आदेशापर्यंत कायम ठेवण्यात येत आहे.

३. सदर नियुक्त्या महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती व मानधन) नियम, १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहतील.

४. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरुस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**वैशाली पं. बोरुडे,**
कार्यासन अधिकारी.

---

# संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४३.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक-राजस्व-३-भु.सं.-कावि-१९-२०२०.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, क्र. ८२०, दिनांक १६-११-२०१९ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, पुसद, जिल्हा यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०५-४७-२०१५-१६,

मौजा ईसापुर, ता. दिग्रस, जि. यवतमाळ.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ६२ | ० ५५ |
| २ | ६१ | ० ५६ |
| ३ | ६० | ० ०६ |
| ४ | ६७ | ० ४५ |
| ५ | ७१ पै | ० ६१ |
| ६ | ७० पै | ० १४ |
| ७ | ७० पै | ० १७ |
| ८ | ६९ पै | ० ०२ |
| ९ | ६९ पै | ० ०९ |
| १० | ८३ पै | ० १८ |
| ११ | ८३ पै | ० १३ |
| १२ | ८२ | ० ४३ |
| १३ | ८१ | ० ०३ |
| | एकूण . . | ३ ४२ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव.—दिग्रस-पुसद रा. मा. क्र. २५७ व दिग्रस आर्णी रा. मा. क्र. २७३ जोडणारा दिग्रस वळण रस्ता बांधकाम.

प्रकल्प कार्याचे वर्णन.—दिग्रस वळण रस्ता बांधकाम सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ.

समाजाला मिळणारे लाभ.—पायाभूत सोई-दळणवळण मार्गाची निर्मिती होवून वस्तु, व्यक्तींची वेगवान वाहतूक शक्य होवून आर्थिक विकासाला चालना मिळेल.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

– निरंक –

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

– निरंक –

**टीप :–**उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, पुसद, जिल्हा यवतमाळ यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

यवतमाळ :
दिनांक २१ जानेवारी २०२०.

**अजय गुल्हाणे,**
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४४.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक-प्रअ-भूसं-अका-कावि-८१-२०२०.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त अधिनियम ” असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, क्र. ४६२, दिनांक १८-०७-२०१९ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बेंबळा प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी मौजा येरड-१ (ओंकारखेडा) या पुनर्वसित गावातील पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीच्या कामाकरीता निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.-४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०६-४७-२०१८-१९,

मौजा शहापूर, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ४/२ | ० ०९ |
| | भूसंपादनाचे एकूण क्षेत्र . . | ० ०९ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव.—बेबळा प्रकल्प, ता. व जि. यवतमाळ.

प्रकल्प कार्याचे वर्णन.—बेंबळा प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी मौजा येरड-१ (ओंकारखेडा) या पुनर्वसित गावातील पाणी-पुरवठा योजनेच्या विहिरीच्या कामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ.—लाभधारकांना यामध्ये पाणीपुरठाविषयी सुविधेकरीता.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

– निरंक –

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

– निरंक –

**टीप :–**उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प क्रमांक ४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

दिनांक ३० जानेवारी २०२०.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४५.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भू.स.-अ.का.-कावि-४२-२०२०.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९-०१-२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा केला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.) ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखिल घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदूर रेल्वे यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ३-४७-२०१५-१६,

गाव ढेंगाळा, तालुका नांदगाव खंडेश्वर, जिल्हा अमरावती.

| अ. क्र. | ग्रा. पं. ८ अ प्रमाणे घर क्रमांक | अंदाजित क्षेत्र (चौरस मीटरमध्ये) | | |
|---|---|---|---|---|
| | | बांधकाम क्षेत्रफळ | खुले क्षेत्रफळ | एकूण क्षेत्रफळ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | चौ. मी. | चौ. मी. | चौ. मी. |
| १ | ४ | २६.०१ | २६.०१ | ५२.०२ |
| २ | १ | २६.९४ | ५३.८८ | ८०.८२ |
| ३ | ३ | २४.१५ | ३६.२३ | ६०.३८ |
| ४ | १६ | ० | ८३.६१ | ८३.६१ |
| ५ | ८ | ० | ७४.३२ | ७४.३२ |
| ६ | ९ | ६९.६८ | ४१.८१ | १११.४९ |
| ७ | २ | १८.५८ | ५५.७४ | ७४.३२ |
| ८ | ५ | ६१.३२ | ९६.६२ | १५७.९४ |
| ९ | १३ | ६९.६८ | ६९.६८ | १३९.३६ |
| १० | ६ | ९२.९० | १४८.६४ | २४१.५४ |
| ११ | ११ | ३७.१६ | ३७.१६ | ७४.३२ |
| १२ | १०क | १५.७९ | १५.७९ | ३१.५८ |
| १३ | १०ब | १५.७९ | १५.७९ | ३१.५८ |
| १४ | १०अ | १५.७९ | १५.७९ | ३१.५८ |
| १५ | १२ | १४८.६४ | ० | १४८.६४ |
| १६ | १९ | ० | १५४.६८ | १५४.६८ |
| १७ | १८ | ० | १५४.६८ | १५४.६८ |
| १८ | १७ | ० | १५४.६८ | १५४.६८ |
| १९ | २१ | ० | ६०४.९८ | ६०४.९८ |
| २० | २० | ० | १५४.६८ | १५४.६८ |
| २१ | ७ | ० | १११.४८ | १११.४८ |
| | एकूण क्षेत्रफळ . . | ६२२.४३ | २१०६.२५ | २७२८.६८ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव : निम्न साकळी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन : निम्न साकळी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत बुडीत क्षेत्राकरीता.

समाजाला मिळणारे लाभ : . . . . . .

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापनाची आवश्यकता नाही.

सबब माहिती-निरंक

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४अ, महसूल व वन विभाग, मुंबई, दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसूचना अन्वये सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम : प्रशासकीय नियुक्तीची आवश्यकता नाही.

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील. : निरंक

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदूर रेल्वे यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

अमरावती :
दिनांक १० जानेवारी २०२०.

**शैलेश नवाल,**
जिल्हाधिकारी, अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४६.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक-कावि-भूसंपादन-मं.अ.-१४६०-२०१९.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, असाधारण क्र. १६०, महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक ११-०९-२०१५ क्रमांक संकिर्ण ११-२०१४-प्र.क्र.-७७-भाग-२/अ-२, दिनांक १८-०२-२०१६ (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त अधिसूचना ” असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या बुलढाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरःस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखिल घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, सिंदखेडराजा यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ४-२०१६-१७,

गाव निमगाव वायाळ, तालुका सिंदखेडराजा, जिल्हा बुलडाणा.

| अ. क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १३१ | ० ०१ |
| २ | १३२ | ० ०२ |
| | एकूण . . | ० ०३ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : खडकपूर्णा प्रकल्प, देऊळगावराजा.

प्रकल्प कार्याचे वर्णन : खडकपूर्णा प्रकल्पाच्या निमगाव-वायाळ उपसा सिंचन योजनेच्या मुख्य कालव्याच्या कामासाठी मौजे निमगाव वायाळ, तालुका सिंदखेडराजा, जि. बुलडाणा येथील खाजगी जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव ० ०३ हे. आर

समाजाला मिळणारे लाभ : या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्याना पाणी पुरवठा होणर आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मीती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणर असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

सदरचा कालवा हा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा कालवा हा कमी क्षेत्रावरुन जात असून त्यास शेतक-यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापित होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-चार

## सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

नवीन भूसंपादन कायदा, २०१३ कलम (६) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

## अनुसूची-पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम : या कालव्यामुळे शेतीसाठी पाणी, तसेच जमिनीच्या भूगर्भातील पाण्याची पातळीत वाढ होणर असून त्यामुळे सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्याना पाणी पुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मीती होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरचा कालवा हा अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील असून अतिशय कमी क्षेत्रावर आहे. सदर कालव्यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रशासक नियुक्तीचा प्रश्नच उद्भवत नाही.

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील. : निरंक

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, सिंदखेडराजा, ता. सिंदखेडराजा, जि. बुलडाणा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

बुलडाणा :
दिनांक २७ डिसेंबर २०१९.

**सुमन चंद्रा,**
जिल्हाधिकारी, बुलडाणा.

अ.-एक-३ (१७८४).

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४७.

## उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

### शुद्धीपत्र

क्रमांक-कावि-अका-भूसं-६७-२०२०.—

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांचे फाईलवरील भूसंपादन प्रकरण क्र. एलएक्यु-शेगांव-आरडी-८-पुरवणी-०१-२०१८-१९, ता. शेगांव, जि. बुलडाणा या प्रकरणातील नविन भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलम १९ ची अधिसूचना क्रमांक कावि-अका-भूसं-१६१६-२०१९, दिनांक २३ डिसेंबर २०१९ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक गुरूवार ते बुधवार, जानेवारी २३-२९, २०२० रोजी अ. क्र. २१, पान क्र. २ ते ३ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यातील पान क्र. २ मधील तिस-या ओळीमधील अधिसूचना क्रमांका मधील दिनांकाचे नोंदी मध्ये चूक झालेली आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती वाचावी.—

| याकरीता | | असे वाचावे | |
|---|---|---|---|
| जिल्हा, गांव, तालुका | प्रसिद्ध केलेला तपशील | जिल्हा, गांव, तालुका | प्रसिद्ध करावयाचा तपशील |
| बुलडाणा,<br>शेगांव,<br>शेगांव, | अधिसूचना क्रमांक ९९२-२०१९,<br>दिनांक २६ जुलै २०१८ अन्वये<br>प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. | बुलडाणा,<br>शेगांव,<br>शेगांव, | अधिसूचना क्रमांक ९९२-२०१९,<br>दिनांक २६ जून २०१९ अन्वये<br>प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. |

खामगांव :
दिनांक २८ जानेवारी २०२०.

**मुकेश चव्हाण,**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, खामगांव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.